**प्रेस नोट दिनांक ०८/०५/२०१९**

**फरासखाना पोलीस स्टेशन,पुणे शहर**

**''विधीसंघर्षीत बालक व त्यांचे पालकांचे पोलीसांनी केले समुपदेशन''**

बाल गुन्हेगारीचे प्रमाण रोखण्यासाठी फरासखाना पोलीस स्टेशन,पुणे विशेष बाल सुरक्षा पथक, भरोसा सेल पुणे व लाईफ पुनर्वसन, सयुक्तांने प्रशिक्षण शिबीर आयोजित केले होते. सदर शिबीरामध्ये विधीसंघर्षग्रस्त बालकांनी गुन्हेगारी प्रवृत्तीपासून परावृत करणे व त्यांना आधार देण्याकरिता त्यांना प्रशिक्षण देण्यात आले. विधी संघर्षीत बालकांचे पालक यांना योग्य व उचित असे मार्गदर्शन केले. त्यांच्या अडचणी शंका समजून घेतल्या, विधी संघर्षित बालकांना गुन्ह्यापासून कसे प्रवृत्त करता येईल, तसेच त्यांच्यावर कसे संस्कार करता येतील याबाबत माहिती देण्यात आली. सदर शिबीराचे वेळी श्री. किशोर नावंदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे श्री. कलगुटकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विश्रामबाग पोलीस स्टेशन, पुणे, पोलीस उप निरीक्षक श्री. लिंगे तसेच भरोसा सेलचे पोउपनि. भोर, व त्यांचा स्टाफ तसेच लाईफ संस्थेचे मा. महेश वरदे, पंकज टिपाडा, साहेर भाई असे हजर होते. नमूद शिबीरा दरम्यान विधी संघर्षीत बालक व त्यांचे पालक यांनी उपस्थित केलेल्या शंका याबाबत त्यांचे समाधान केले. विधीसंघर्षीत बालकांचे पालक यांनी पोलीसांनी घेतलेल्या शिबीराचे कौतुक केले आहे.

(किशोर नावंदे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे

मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, फरासखाना पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली फरासखाना पो. ठाणे व विश्रामबाग पो. ठाणे हद्दीतील विधीसंघर्षग्रस्त बालक व त्यांच्या पालकांना विशेष बाल सुरक्षा पथक भरोसा सेल पुणे व लाईफ पुनर्वसन, सयुक्तांने प्रशिक्षण शिबीर आयोजित केले होते. सदर विधीसंघर्षग्रस्त बालकांनी गुन्हेगारी प्रवृत्तीपासून परावृत करणे व त्यांना आधार देण्याकरिता त्यांना प्रशिक्षण देण्यात आले. विधी संघर्षीत बालकांचे पालक यांना योग्य व उचित असे मार्गदर्शन केले. त्यांच्या अडचणी शंका समजून घेतल्या, त्यांना विधी संघर्षित बालकांना गुन्ह्यापासून कसे प्रवृत्त करता येईल, तसेच त्यांच्या कसे संस्कार करता येतील याबाबत माहिती देण्यात आली. सदर मिटींग वेळी भरोसा सेलचे पोउपनि. भोर, तसेच त्यांचा स्टाफ व लाईफ संस्थेचे मा. महेश वरदे, पंकज टिपाडा, साहेर भाई यांच्या मार्गदर्शनाखाली मिटींग घेण्यात आली. मिटींग दरम्यान मा. वपोनि तसेच आम्ही स्वतः व विश्रामबाग पो.स्टे. बालपथकातील अधिकारी व कर्मचारी हजर होते .नमूद मिटींग दरम्यान त्यांनी उपस्थित केलेल्या शंका याबाबत त्यांचे समाधान केले. त्यांची सविस्तर माहिती नोंद वहीत नोंद घेतली खेळी मेळीच्या वातावरणात हसत खेळत मिटींग पार पडली.

तरी सदर बाबत स्टेशन डायरी नोंद होणेस विनंती आहे.

मा.सा.व्हावे
दि.०७/०५/२०१९

(एम. एच. लिंगे)
परि. पोलीस उपनिरीक्षक
फरासखाना पोलीस ठाणे, पुणे शहर